नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/12/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## विनयभंग

1) पो.स्टे. भिवापुरः– दिनांक 14/12/2021 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 45 वर्ष ही आरोपी नामे– सुरेश जोधरू पडोळे, रा. चिचाळा याच्या शेतात सोला निंदन काम करण्याकरीता गेली होती. निंदन काम झाल्यानंतर आरोपी याने फिर्यादीस नालीवरील गवत कापण्यासाठी चल असे म्हटले, तेव्हा फिर्यादी यांनी नकार दिला तरीसुदधा जबरदस्तीने फिर्यादीला नालीवर गवत कापण्यासाठी नेले व फिर्यादीस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दुर्गा शंभरकर मो.नं 8208453795 या करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– दिनांक 27/12/2021 चे 11.10 वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 15 वर्ष ही घराजवळ शाळेत जाण्याकरीता बसमध्ये बसली व जिवन विकास चौक जवळ उतरली. ती आपल्या शाळेकडे जात होती तेव्हा रोडवर आरोपी नामे– त्रृत्विक प्रमोद बोबडे, रा. शिरपुर याने तिचा पाठलाग केला. यानंतर आरोपीने तिचे समोर गाडी उभी केली "तु माझ्याशी बोलत का नाही, तर मी तुला तलवारीने मारून टाकीन, तु माझी नाही तर कोणाची नाही हा माझा एरीया आहे, मला कोणीही काही करू शकत नाही" तसेच आरोपी हा फिर्यादीचे परिवाराला अश्लिल शिवागाळ करीत होता. तसेच आरोपी हा त्याचे गाडीवरून उतरला आणि फिर्यादीला मारायला आला. तेव्हा त्याला आजुबाजुचे लोक पाहत होते म्हणुन तो तिथुन पळाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ)(ड), 294, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असेन गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि शितल खोब्रागडे मो.क. 8308082094 या करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :– दिनांक 17/12/2021 चे 16.00 वा. ते 16.15 वा. दरम्यान आरोपी क्र 1) नाजीम खान व फिर्यादी वय 47 वर्ष हिचे मुलाचा झगडा भांडण झाला होता. याच कारणावरून आरोपी क्र 2) नईम खान दोन्ही रा. काटोल हे फिर्यादीचे घरासमोर आले व फिर्यादीस अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. फिर्यादीने आरोपीतास 'माझे पति घरी नाही' असे म्हटले असता आरोपी क्र. 2 याने फिर्यादीस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व परिवारास जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 354, 294, 504, 506, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास करीत आहे

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील भानेगाव शिवार पारशिवनी टि पाईन्ट येथे दिनांक 26/12/2021 चे 22:20 वा. ते 22.30 वा. दरम्यान एमएच– 27/डिएक्स– 9696 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– रफिक शौकत शेख, वय 42 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 गोदेगाव याने आपले वाहन निष्काळजीपणे चालवुन समोरून येणारी एमएच– 40/एसी– 0167 क्रमांकाची मारोती अल्टोचे चालकाने आपली ताब्यातील अल्टो कारचे उजव्या भागाचा टायर बसल्याने आपले वाहन लहरतांना चालविल्याने यातील आरोपी टिप्परचे चालकाने आपले टिप्पर कारला डाव्या भागाला धडक लागली. या अपघातात अल्टो कार चालक नामे– लुकेश भागवतराव नागपूरे, वय 36 वर्ष, रा. कळंबाळ, ता. पारशिवनी हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकामी ॲलेक्सीस हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक रमेश मसराम यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी अटक असून एमसीआर वर रवाना. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान पोस्टे खापरखेडा मो.क्र. 8208511663 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 17 कि.मी. अंतरावरील एकता शिबीर प्रोडक्ट कंपनी कढोली येथे दिनांक 25/12/21 चे 16.00 वा. सुमारास चौनलाल बालाराम साचोपाच (मृतक) वय 50 वर्ष रा बालाघाट जि सिवनि मध्यप्रदेश हा एकता शिबीर प्रोडक्ट कंपनी येथे कामाला गेला असतांना अचानक त्याला चक्कर आल्याने तो खाली पडला. त्यास उपचाराकामी मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई विकास मस्के यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक देवेंद्र भुरे मो.क्र. 9588679814 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत खदान नं. 6 कन्हान येथे दिनांक 27/12/2021 चे 20.40 वा. पुर्वी फिर्यादी चा मुलगा नामे– जोगधर विध्या गोस्वामी (मृतक), वय 38 वर्ष, रा. खदान नं. 6 कन्हान यांची पत्नी दीड वर्षा आधीच मरण पावली असुन त्यांची मुले सासरी ठेवून तो घटना ठिकाणी एकटाच राहत होता. तो अती दारू पिण्याचा सवयीचा असुन दि. 27/12/2021 रोजी 15.30 वा. नातीनच्या ईलाजाचे कागदपत्रे आणण्याकरीता तो गेला असतांना त्याने गळफास घेवून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विध्या मधुरा गोस्वामी, वय 62 वर्ष, रा. नं. वार्ड 5 खदान कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेक मो. क्र. 9284262596 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर